नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०६/२०२६ (रविवार)

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा अभिनव उपक्रम
## महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सुविधेसाठी मोबाईल स्वच्छतागृह वाहनाची उपलब्धता

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामार्फत महिला अधिकारी व अंमलदारांच्या सोयीसाठी एक अभिनव व संवेदनशील उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, निवडणूक बंदोबस्त, उत्सव, यात्रा, व्हीआयपी दौरे तसेच दीर्घकाळ चालणारे विशेष बंदोबस्तादरम्यान महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने एका वाहनाचे रूपांतर अत्याधुनिक मोबाईल स्वच्छतागृहात करण्यात आले आहे.

सदर मोबाईल स्वच्छतागृह वाहनामध्ये महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी स्वच्छ व सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, बंदोबस्ताच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार हे वाहन तैनात करण्यात येईल. तसेच रोड बंदोबस्त किंवा विविध ठिकाणी सुरू असलेल्या सुरक्षा व्यवस्थेनुसार हे वाहन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवून महिला अधिकारी व अंमलदारांना सुविधा पुरविण्यात येणार आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील महिला अधिकारी व अंमलदार विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडत असून अनेकदा त्यांना दीर्घकाळ मैदानी बंदोबस्तावर कार्य करावे लागते. अशा परिस्थितीत त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सन्मानाचा विचार करून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.




MOBILE SHE VAN





## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नागपूर ग्रामीण पोलीस दलात विविध कार्यक्रमांचे आयोजन

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात दिनांक २१/०६/२०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन तसेच पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे योगादिना निमित्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याला प्रोत्साहन देण्यासाठी सकाळच्या सत्रात सामूहिक योगाभ्यास करण्यात आला. पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे आयोजित मुख्य कार्यक्रमामध्ये विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. योगाभ्यासाचे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, तणावमुक्त जीवनशैली आणि कार्यक्षमतेवर होणारे सकारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर योग दिनानिमित्त विशेष योग सत्रांचे आयोजन करण्यात आले. सर्व कार्यक्रम उत्साहपुर्ण वातावरणात पार पडले.














## बेला पोलीस स्टेशन हद्दीतील ४ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्पार

**पोलीस स्टेशन बेला हदद्दीतील विविध गुन्हयातील ४ आरोपी यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्पार केले.**

सराईत गुन्हेगार नामे **१) उद्धव जयवंतराव लांबट, वय ३१ वर्ष, रा. बोरगाव ला., ता. उमरेड, जि. नागपूर** याचेवर लोकांना अडविणे, महीलांविरूध्दचे गुन्हे अशा प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. २) **संजय गुरूदेव सेलकर, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, बेला ता. उमरेड, जि. नागपूर** यांचेवर लोकसेवकाविरूद्ध हमला करणे, बेकायदेशीर जमावात सहभागी होणे, गंभीर दुखापत करणे, व लोकांना अश्लील शिवीगाळ करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहे. **३) राजकुमार प्रताप कामडी, वय ३८ वर्ष, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपूर** याचेवर अवैधरीत्या दारूविक्री तसेच रेती चोरी करण्याचे गुन्हे आहेत. **४) नरेश झित्रुजी सोरते, वय ३५ वर्ष, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपूर** याचेवर अवैधरीत्या दारूविक्री तसेच रेती चोरीचे गुन्हे दाखल आहेत. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु

आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव बेला पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद चारही आरोपी यांना **४ महीन्याकरीता** नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**उद्धव जयवंतराव लांबट**



संजय गुरूदेव सेलकर



राजकुमार प्रताप कामडी



**नरेश झित्रुजी सोरते**

# अवैधरित्या विनापरवाना ताडी विक्री व्यवसाय करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २१/०६/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, जलालखेडा येथिल सोमेश्वर देवस्थान, रोड लगतच्या बाजुला एक ईसम अवैध्यरित्या विनापरवाना ताडीची दारु विकत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ सदर ठिकाणी सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी **गोपागोनी कनकैय्या रामास्वामी, वय ५५ वर्षे, रा. नेरमेट्टा, जि. वरंगल राज्य तेलंगणा, ह.म. महादेव चवरे हयांचे घरी किरायाने, वार्ड नंबर ३, जलालखेडा** याचे घराची घरझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन एकुण १३५.५ लिटर अवैध विनापरवाना गावठी ताडीची दारुची विक्री करतांना व स्वत:चे ताब्यात बाळगतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष** एकुण १३५.५ लिटर गावठी ताडीची दारू आणि साहीत्या असा एकुण किंमती १४,४५०/—रूपयाचा मुद्देमाल **जप्त केला आहे. नमुद आरोपी गोपागोनी कनकैय्या रामास्वामी, वय ५५ वर्षे, रा. नेरमेट्टा, जि. वरंगल राज्य तेलंगणा, ह.म. महादेव चवरे हयांचे घरी किरायाने, वार्ड नंबर ३, जलालखेडा याचेविरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**





## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक २०/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी १) अमित धनराज कडमधाड, वय ४४ वर्ष, रा. सिंगारखेडा ता. नरखेड हा वार्ड क्र. १२ नरखेड येथे २) नरेश लक्ष्मणसिंग दिदावत, वय ५१ वर्ष, रा. बेलोना, नरखेड हा बाजार चौक बेलोना पुलाजवळ नाल्याच्या बाजूला सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २०/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा, देशी दारू व इतर साहित्य असा एकुण १५४२७०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे युवराज गुलाब नान्हे, वय ४५ वर्ष, रा. नवेगाव (देशमुख ) ता. भिवापुर

याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे सुरेश सखाराम साखरकर, वय ३६ वर्ष, रा. तितुर, ता. कुही, ज. नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे महिला आरोपी हिचे वर २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी अक्षय अनिल तायवाडे, वय १९ वर्ष, रा. खरसोली, ता. नरखेड याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी सचिन देवाजी गायकवाड, वय ३२ वर्ष, रा. पंचधार, ता. काटोल याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी अनोद उर्फ पांडया चौक सोलंखी, वय ३८ वर्ष, रा. छत्रापुर, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** आरोपी संजु उर्फ सजीव दादाराव अखंडे, वय ३९ वर्ष, रा. सिध्दीवीनायक मंदीर बाजुला कळमेश्वर २) सुरज संजय मंडलीक, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र ४, झेडा चौक कळमेश्वर ३) पुरूषोत्तम सोमाजी पाटील, वय ४९ वर्ष, रा. कोलबा स्वामी मंदीर जवळ कळमेश्वर ४) निलेश देवरावजी गोतमारे, वय ३६ वर्ष, रा. घोराड, तह कळमेश्वर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी १) संकेत जयपाल कोसरे, वय ३० वर्ष, रा. भोवरी ता. कामठी २) ओमप्रकाश गोविंद सिंदुरकर, वय २७ वर्षे रा. भोवरी, ता. कामठी, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २५ लिटर मोहाफुल दारू, २०० लिटर मोहाफुल सडवा, २२५०० मिली देशी दारू, इतर साहित्य असा एकुण १५४२७०/— रूपयांचा मुद्द्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्द्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने